विना सहकार नाही उध्दार !

पारिजात को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि. नवी मुंबई

स्थापना १९९७

# पारिजात

## को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.

नोंदणी क्र. : टी.एन.ए. (टी.एन.ए.) / आर.एस.आर./ सी.आर./९५१/९७






# १७ वा वार्षिक अहवाल

## सन २०१३-२०१४

**प्रशासकीय कार्यालय :** पारिजात भवन, प्लॉट नं. १८, सेक्टर १० ए, नेरुळ, नवी मुंबई ४०० ७०६.

www.parijatcreditsociety.com

# विद्यमान संचालक मंडळ



श्री. कृष्णा पां. धुमाळ
अध्यक्ष



श्री. श्रीपती शं. गरुड
उपाध्यक्ष



श्री.बाळासाहेब वि.ताकवले
सचिव



श्री. दिपक शं. टेळे
खजिनदार



श्री. कैलास वि. खोपडे
संचालक



श्री. अनंत ना. प्रभाळे
संचालक



श्री. अमृत दा. पाटील
संचालक



श्री. आनंदा बा. आंबवले
संचालक



श्री. शंकर रा. पुली
संचालक



सौ. मंदाताई ज्ञा.खोपडे
संचालिका



श्री. सचिन य. रणनवरे
कर्मचारी प्रतिनिधी



श्री. तानाजी गु. शिंदे
व्यवस्थापक

# पारिजात को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि., नवी मुंबई

रजि. नं. टी.एन.ए.(टी.एन.ए.)/आर.एस.आर./(सी.आर.) ९५१/९७

प्रशासकीय कार्यालय : पारिजात भवन, फ्लॉट नं. १८, सेक्टर १० ए, नेरुळ, नवी मुंबई-४०० ७०६.

## सतराव्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यांत येते की, पारिजात को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., नवी मुंबई या संस्थेची **सतरावी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. १०/८/२०१४ रोजी सकाळी १०.०० वाजता गुरव ज्ञाती भवन,२-सी/३,सेक्टर ९-ए, बस डेपोजवळ, वाशी, नवी मुंबई,** या ठिकाणी संस्थेचे अध्यक्ष श्री. कृष्णा पां. धुमाळ यांच्या अध्यक्षतेखाली खालील नमूद केलेल्या विषयांचा विचार विनिमय करण्यासाठी आयोजित केली आहे. तरी सर्व सन्माननीय सभासदांनी वेळेवर उपस्थित राहून कामकाजात भाग घ्यावा ही विनंती.

## सभेपुढील विषय

१) दि. ११/०८/२०१३ रोजी झालेल्या सोळाव्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२) दि. ३१ मार्च २०१४ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षाचा, संचालक मंडळाने सादर केलेला अहवाल, नफा तोटा व ताळेबंद पत्रक यांना मंजुरी देणे.
३) मा. संचालक मंडळाने सुचविलेल्या सन २०१३-२०१४ नफा विभागणीस मंजुरी देणे.
४) सन २०१३-२०१४ या आर्थिक वर्षाच्या वैधानीक लेखापरिक्षण अहवाल वाचून स्विकृत करणे.
५) सन २०१४-२०१५ सालाकरिता वैधानीक लेखापरिक्षकांची नेमणूक करणे व त्यांचे मानधन ठरविणे.
६) सन २०१४-२०१५ च्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे.
७) संस्थेच्या कर्ज, गुंतवणुक, प्रशिक्षण, वसुली व के.वाय.सी.इ.च्या वार्षिक धोरणांना मान्यता देणे.
८) संस्थेने तयार केलेल्या सभासद निधी नियमावली व कर्मचारी सेवा नियमावलीस मंजुरी देणे.
९) संस्थेच्या कार्यक्षेत्रामध्ये नवीन शाखा विस्तार करणेस मंजुरी देणे.
१०) संस्थेच्या मुंबई व पुणे विभागातील शाखांसाठी स्वमालकीची जागा खरेदी करण्यास मंजुरी देणे.
११) उपविधीतील पोटनियम दुरुस्तीस मंजूरी देणे.
१२) वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असणाऱ्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.
१३) मा. अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.

संचालक मंडळाच्या वतीने
श्री. बाळासाहेब वि. ताकवले
(सचिव)

ठिकाण : नवी मुंबई.
दिनांक : २२/७/२०१४

## विशेष सूचना

१) गणसंख्ये अभावी सभा तहकूब झाल्यास, ठरलेल्या वेळेनंतर अर्ध्या तासाने त्याच ठिकाणी ही सभा घेण्यात येईल व त्या सभेस गणसंख्येचे बंधन राहणार नाही.
२) ज्या सभासदांना प्रश्न विचारावयाचे असतील अगर सुचना करावयाच्या असतील त्यांनी नियोजीत सभेच्या तारखेपूर्वी सात दिवस अगोदर संस्थेच्या कार्यालयात लेखी कळविणे आवश्यक आहे.
३) सभेस येताना अहवालाची प्रत बरोबर आणावी.



## अध्यक्षांचे मनोगत...

सन्माननिय सभासद बंधू भगिनींनो,

आपल्या संस्थेचा १७ वा वार्षिक अहवाल आपणासमोर सादर करताना मला अत्यंत आनंद होत आहे. प्रत्येक वर्ष हे आर्थिक संस्थेसाठी आव्हनाचे असते तसेच व्यावसायिक संधीही संस्थेला उपलब्ध करुन देत असते. संस्थेच्या सर्व आर्थिक धोरणाची आकडेवारी या अहवालात आम्ही सादर केलेली आहे. सदर आकडेवारीचा आपण अभ्यास केला तर संस्थेच्या संचालक मंडळाने केलेल्या १७ वर्षाच्या प्रगतीस आपण निश्चितच दाद दयाल हा विश्वास वाटतो.

आपल्या संस्थेने प्रगतीचा आलेख उंचावत सन २०१३-२०१४ या आर्थिक वर्षात एकूण संमिश्र व्यवसाय **"रु. ११८ कोटींचा"** टप्पा पार केला आहे. संस्थेच्या ठेवी रु. ५८ कोटी व कर्ज वाटप रु. ४० कोटीच्या पुढे असून संस्थेने रु.२० कोटीपेक्षा जास्त रक्कमेची स्वतंत्र गुंतवणूक केलेली आहे. संस्थेच्या स्वनिधी रु. ६ कोटी असून त्याच धडाडीने कर्जवसुली ९८.४५% पेक्षा जास्त केलेली आहे. संस्थेचे नऊ शाखा व स्वमालकीचे प्रशासकीय कार्यालय असा विस्तार असून संस्था स्वभांडवलावर भक्कमपणे उभी आहे. संस्थेला चालु आर्थिक वर्षात आवश्यक असणाऱ्या सर्व तरतुदी केल्यानंतर रु. ६५ लाख निव्वळ नफा झाला आहे. आपणा सर्वाच्या सहकार्यामुळेच संस्थेने दरवर्षी प्रमाणे चालु वर्षाचा **"प्रगतीचा आलेख"** आणखी उंचावर नेला आहे. याचा मला सार्थ अभिमान आहे.

९७ व्या घटना दुरुस्तीचा पाया सहकारी संस्थामध्ये व्यावसायिक दृष्टीकोन विकसीत व्हावा हा असून सहकार चळवळीमध्ये सहकारी पतसंस्थाचे मोलाचे कार्य लक्षात घेता पतसंस्था या समाजाच्या विकासासाठी महत्वपुर्ण योगदान देत आहेत. **"ज्याची पत नाही त्याची पत निर्माण करण्याचे कार्य"** पतसंस्थाच्या माध्यमातून होत आहे.

आपल्या संस्थेनेही यासाठी महत्त्वपुर्ण कार्य करुन हजारो कुटूंबाना आर्थिक आधार देऊन स्वताच्या पायावर उभे केले आहे. आपल्या सभासदांना संस्थेविषयी व ठेव आणि कर्ज योजनांची माहिती केव्हाही, कोठेही उपलब्ध व्हावी यासाठी संस्थेने स्वत:ची **वेबसाईड www.parijatcreditsociety.com** या नावाने सुरु केलेली आहे. संस्थेने नविन आदर्श उपविधी २०१३ स्विकारली असुन त्यानुसार गुंतवणूक, प्रशिक्षण, कर्ज वाटप आणि कर्जवसुली, के,वाय.सी., इत्यादी विविध धोरणे तयार केली आहेत. सहकार खात्याने सर्व सहकारी पतसंस्थाना केवायसी (KYC) प्रणालीचा अवलंब काटेकोरपणे करणे बंधनकारक केले आहेत. त्यामुळे मी संस्थेच्यावतीने आपणा सर्वाना व खातेदार यांना विनंती करतो की, सर्वांनी आपआपल्या खात्यांमध्ये केवायसी (KYC) नियमांचे पालन करण्यासाठी कागदपत्रांची पुर्तता करावी.

संस्थेच्या प्रगतीसाठी अहोरात्र झटणारे संचालक मंडळ, कर्मचारी वर्गाचे कामकाज नियोजन व प्रमाणिकपणा व दैनंदिन ठेव प्रतिनीधी यांचे योगदान आणि सर्व सभासद, ठेवीदार, कर्जदार व हितचिंतक यांचा आर्शिवाद या **भांडवलावर** आपली **"पारिजात संस्था यशस्वी वाटचाल"** करीत आहे. संस्थेच्या उज्वल भरभराटीसाठी आशीच साथ लाभो हि ईश्वर चरणी प्रार्थना करतो. आपण सर्वांनी वार्षिक सर्वसाधरण सभेस कामकाज चालविण्यास सहकार्य केले त्याबद्दल आपणा सर्वांचे पुन:श्च आभार!

जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!

आपला सहकारी

कृष्णा धुमाळ

(अध्यक्ष)

## १७ वा वार्षिक कार्य अहवाल सन २०१३ - २०१४

सन्माननीय सभासद बंधू भगिनींनो,

संस्थेच्या संचालक मंडळाच्या वतीने दिनांक ३१ मार्च २०१४ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा १७ वा वार्षिक अहवाल, ताळेबंद पत्रक व नफा -तोटा पत्रक आपणासमोर सादर करताना आम्हास कर्तव्यपूर्तीचा विशेष आनंद होत आहे. दरवर्षीप्रमाणे या वर्षीसुद्धा संस्थेने आपल्या प्रगतीची वाटचाल ठरवून दिलेल्या उद्दिष्टानुसार चालू ठेवलेली आहे.

अहवाल वर्षात संस्थेने केलेल्या प्रगतीची व कामकाजाची कल्पना पुढील आकडेवारीवरुन येईल.

## संस्थेची वित्तीय स्थिती :-

(रु.लाखात)

| तपशिल | ३१/३/२०१३ रु. | ३१/३/२०१४ रु. | वाढ रु. | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| भाग भांडवल | १९७.७२ | २१७.४५ | १९.७३ | ९.९८ % |
| राखीव व इ.निधी | २९८.४९ | ३६०.५४ | ६२.०५ | २०.७९ % |
| सभासद ठेवी | ४९३७.३६ | ५८१९.८७ | ८८२.५१ | १७.८७ % |
| गुंतवणूक | १५५६.०८ | २०२२.०० | ४६५.९२ | २९.९४ % |
| सभासद कर्जे | ३६१६.२८ | ४०१७.७६ | ४०१.४८ | ११.१० % |
| खेळते भांडवल | ५५६६.६६ | ६५५७.६९ | ९९१.०३ | १७.८० % |

पारिजात संस्थेने सहकारी तत्वाचा पुर्ण सन्मान राखून आपल्या आर्थिक व सामाजिक सेवेने आम जनतेमध्ये विश्वासाची, सहकाराची, विकासाची भावना निर्माण केली आहे. सभासद ठेवीदार व हितचिंतक यांच्या सहाय्याने व नि:स्वार्थीपणे केलेल्या अव्याहत परिश्रमामुळे संस्थेने आपल्या प्रगतीची उद्दिष्टे व आर्थिक धोरणे जोपासली असून केलेली प्रगती नेत्रदिपक आहे. याबद्दल आपले दुमत होणार नाही याची आम्हाला खात्री आहे.

## संस्थेच्या प्रगतीचा विस्तृत आढावा

### सभासद : ७८८६

गतवर्षी संस्थेचे ७३३८ सभासद होते, अहवाल वर्षात ७३८ नवीन सभासद झाले आणि १९० सभासदांनी राजीनामा दिल्यामुळे अहवाल वर्षाअखेर ७८८६ सभासद संख्या झाली आहे.

### भाग भांडवल : रु. २१७.४५ लाख

संस्थेचे अधिकृत भागभांडवल रुपये पाच कोटी असुन गतवर्षाअखेर संस्थेचे वसुल भागभांडवल रु. १,९७,७२,०००/- इतके होते. त्यामध्ये अहवाल वर्षात रु. १९,७२,६००/- ने वाढ होऊन दि. ३१ मार्च २०१४ अखेर संस्थेचे वसुल भागभांडवल रु. २,१७,४४,६००/- इतके आहे.

## गंगाजळी व इतर निधी : रु. ३६०.५४ लाख

संस्थेची जनमानसात असलेली विश्वासार्हता ही संस्थेच्या स्वनिधीवर अवलंबून असते. निधी जेवढा जास्त तितका संस्थेचा पायाही मजबूत असतो, यानुसार संस्थेने राखीव निधी, इमारत निधी, संशयित व बुडीत कर्ज निधी, गुंतवणुक चढ उतार निधी, लाभांश समीकरण निधी, सभासद कल्याण निधी, धर्मादाय निधी, आकस्मिक निधी, सेवक कल्याण व प्रशिक्षण निधी, रौप्यमहोत्सव निधी उभारलेले आहेत.

गतवर्षाचे संस्थेचे एकूण स्वनिधी रु. २,९८,४८,८६४/- होते त्यामध्ये अहवाल साली रु. ६२,०४,९१२/- ने वाढ होऊन वर्षा अखेरीस एकूण स्वनिधी रुपये ३,६०,५३,७७६/- इतका झाला आहे.

## ठेवी : रु. ५,८१९.८७ लाख

संस्थेच्या ठेवी संकलनामध्ये अहवाल वर्षात नेत्रदिपक वाढ झाली आहे. संस्था देत असलेली ग्राहक सेवा तसेच आपणा सर्वांचा दृढ विश्वास यामुळेच हे साध्य होऊ शकले.

गतवर्षाअखेर ठेवी रु. ४९,३७,३६,४१६/- होत्या. त्यामध्ये रु. ८,८२,५०,९४६/- ने वाढ होऊन दि. ३१ मार्च २०१४ अखेर संस्थेच्या एकूण ठेवी रु.५८,१९,८७,३६२/- झाल्या असून ठेवी वाढीचे प्रमाण १७.८७% इतके आहे.

संस्थेने ठेवीदारांकरिता विविध आकर्षक ठेव योजना बनविल्या असून प्रत्येक सभासदांनी ठेव योजनेत पैसे गुंतवून लाभ घ्यावा. संस्थेच्या विविध योजनांमध्ये अहवाल वर्षाअखेर खालीलप्रमाणे ठेवी जमा झालेल्या आहेत व त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

रु. लाखात

| ठेवीचा प्रकार | सन २०१०-११ | सन २०११-१२ | सन २०१२-१३ | सन २०१३-१४ |
|---|---|---|---|---|
| बचत ठेव | २,९८,७६,१६० | ३,५५,९९,४७१ | ३,३४,६२,४५६ | ४,३५,४५,१४९ |
| दैनंदिन बचत ठेव | ७,५१,६४,९७९ | ९,७०,९७,२१० | ११,५४,९८,९८८ | १३,०८,२३,११४ |
| अल्प मुदत ठेव | ६,२६,३४,४५३ | ४,५१,७८,६५५ | ६,९६,२७,६०१ | ५,७६,५६,१५८ |
| मुदत ठेव | ५,६६,६३,०५४ | ४,४४,६१,६५५ | ३,७२,२२,४६६ | ४,६२,३८,९८१ |
| दामदुप्पट ठेव | १,९९,३०,६५४ | १,९७,१८,७०५ | २,०७,४२,७१८ | २,५१,९७,२७९ |
| पारिजात बक्षीस | २३,००,३१४ | ३,५९,२९९ | २,०५,७९९ | १,४१,९६७ |
| मासिक प्राप्ती ठेव | ३,७३,३६,७२५ | ३,३४,४८,४२५ | ३,९१,७३,८५० | ४,४४,२१,१२५ |
| आवर्त ठेव | २७,०३,४५७ | ३३,३२,८७१ | ३०,४२,०६० | ४०,५१,६९० |
| सभासद ठेव | ३०,५३,४७१ | २९,५१,८८२ | २९,३५,२४१ | २८,२७,७०३ |
| शुभकार्य ठेव | ४,३७,४४,१२३ | ४,५१,२२,९५५ | ४,५९,१०,७६७ | ४,४६,५७,३४५ |
| धनवृद्धी ठेव | ११,६०,५६२ | १०,००० | - | - |
| धनलक्ष्मी ठेव | १,४१,७१,७९० | ४९,७०,००० | ९८,००० | - |
| शुभलक्ष्मी ठेव | १०,२९,०९१ | ७७,७९,८०९ | १,६९,४४,०१८ | १,७९,०८,११४ |
| धनवर्षा ठेव | - | ४,४३,७८,७०२ | ४,६२,४८,५६० | ४,५२,४०,५१० |
| पारिजात ठेव | - | १,६१,५६,९३६ | ४,५३,७८,०४५ | २,२३,०३९ |
| वैभवलक्ष्मी ठेव | - | - | १,७३,२५,८४८ | ६,४५,०६,०७४ |
| धनसंचय ठेव | - | - | - | २,६८,७६,०४८ |
| धनसमृध्दी ठेव | - | - | - | २,७६,७३,०६६ |
| एकूण रु. | ३४,९७,६८,८३३ | ४०,०५,६६,५७५ | ४९,३७,३६,४१६ | ५८,१९,८७,३६२ |

## गुंतवणूक : रु. २०२२.०० लाख

महाराष्ट्र शासनाच्या सहकार खात्याने निधींच्या गुंतवणूकीबाबत घालून दिलेल्या सर्व नियमांचे योग्य प्रकारे पालन संस्थेने केलेले आहे. गतवर्षी संस्थेची गुंतवणूक रु. १५,५६,०८,०८२/- एवढी होती. अहवाल वर्षात त्यात रु. ४,६५,९१,६९१/- ने वाढ होऊन एकूण गुंतवणूक रु. २०,२१,९९,७७३/- एवढी आहे. या वाढीचे शेकडा प्रमाण २९.९४% एवढे आहे.

(रु.लाखात)

| गुंतवणूक तपशील | रक्कम |
|---|---|
| दि. ठाणे जिल्हा. मध्य. सह. बँक लि. भाग | १,०००.०० |
| महा. राज्य. सह. पत. फेड.लि. भाग | ३,०००.०० |
| राखीव निधी (रिझर्व फंड) | ८९,९६,०७३.०० |
| संशयित व बुडित कर्ज निधी | ४५,९४,२२०.०० |
| लाभांश समानिकरण निधी | ४,३९,१२६.०० |
| सभासद कल्याण निधी | २,७४,४८४.०० |
| सेवक ग्रज्युईटी व कल्याण निधी | १,७१,५००.०० |
| धर्मादाय निधी | ५५,०००.०० |
| मुदत ठेव गुंतवणूक | १८,७६,६५,३७०.०० |
| एकूण रु. | २०,२१,९९,७७३.०० |

## कर्जे : रु. ४०१७.७६ लाख

सहकार खात्याच्या मार्गदर्शक सूचनानुसार छोट्या व मोठ्या व्यावसायिक, व्यापारी व नोकरदार सभासदांच्या आर्थिक उन्नतीसाठी व त्यांच्या जीवनावश्यक गरजा भागविण्यासाठी आपली संस्था सदैव कटिबद्ध आहे. म्हणूनच कर्ज वाटपाच्यावेळी सर्वसामान्य सभासदांना आम्ही नेहमी अग्रक्रम दिलेला आहे व त्यांना प्राधान्याने कर्ज पुरवठा करुन सभासदांचे राहणीमान उंचविण्याचा प्रयत्न केलेला आहे. कर्जदारांनी कर्जाची नियमित परतफेड करावी अशी संस्थेची अपेक्षा असते.

गतवर्षाअखेर संस्थेचे रु.३६,१६,२८,३१५/-कर्ज येणे बाकी होते अहवाल सालामध्ये संस्थेने सभासदांना रु.३०,१९,८२,३५८/- नव्याने कर्ज वाटप केले असून रु.२६,१८,३४,६३४/- कर्ज वसुल झालेले आहे. अहवाल वर्षाअखेरीस एकूण रु. ४०,१७,७६,०३९/- कर्ज येणे बाकी आहे.

## कर्ज थकबाकी : प्रमाण १.५५%

संस्थांच्या थकबाकी संदर्भात महाराष्ट्र शासनाच्या सहकारखात्यातर्फे सांगितलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार संस्थांची थकबाकी ही ५% पेक्षा कमी असणे आवश्यक आहे. या बाबत आपल्या संस्थेने योग्य कारणासाठी योग्य तारण घेऊन उत्तम प्रकारे कर्ज वाटप केल्यामुळे थकबाकी मर्यादीत ठेवण्यासाठी आटोकाट प्रयत्न केले आहेत.

मार्च २०१४ अखेर येणे कर्जाशी थकीत कर्जाचे शेकडा प्रमाण १.५५% आहे. गतवर्षीच्या तुलनेत कर्ज थकबाकी शेकडा प्रमाण ०.०५% ने कमी झाले आहे.

## अनुत्पादक मालमत्ता (N.P.A.) व तरतूदी :-

बँकींग व्यवसायात कर्जास मालमत्ता असेही संबोधले जाते. या मालमत्तेपासून (कर्जापासून) संस्थेस उत्पन्न न मिळाल्यास अशा मालमत्तेस 'अनुत्पादक मालमत्ता' (Non Performing Asset) असे म्हणतात व त्याची वेगळी वर्गवारी करावी लागते. ज्याप्रमाणे रिझर्व्ह बँकेने सर्व बँकाना एन.पी.ए. ची वर्गवारी करण्याचे बंधन घातले. त्याचप्रमाणे मा. सहकार आयुक्त व निबंधक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे आदेशानुसार दि. ३१ मार्च २००६ पासून पतसंस्थाना सुद्धा एन.पी.ए.निकष लागू केले व अनुत्पादक कर्जाची कालावधीनुसार तरतूद संस्थेच्या नफ्यातून करण्याचे बंधन घातले आहे.

आपल्या संस्थेचे दि. ३१ मार्च २०१४अखेर निव्वळ एन.पी.ए. चे प्रमाण २.८० % आहे. मा. सहकार आयुक्तांच्या परिपत्रकानुसार निव्वळ एनपीएचे प्रमाण हे ५% पेक्षा कमी असणे आवश्यक आहे. सदर अनुत्पादीत कर्जाची संस्थेने १००% पेक्षा अधिक तरतूद केलेली आहे. दि. ३१ मार्च २०१४ अखेर अनुत्पादीत कर्जाची तरतूद खालील प्रमाणे आहे.

(रु.लाखात)

| अ.क्र. | कर्जाचे वर्गीकरण | येणे कर्ज रक्कम | प्रत्यक्ष तरतूद | NPA साठी आवश्यक तरतूद |
|---|---|---|---|---|
| १. | **उत्पादित जिंदगी** | ३८६०.५६ | ९.७५ | -- |
| २. | **अनुत्पादित जिंदगी** | | | |
| | अ) सर्वसाधारण जिंदगी | ७८.६३ | } ४६.१० | ३.९३ |
| | ब) संशयीत जिदंगी | ७८.५८ | | १५.४२ |
| | क) बुडीत जिंदगी | - | | -- |
| | एकूण | ४०१७.७७ | ५५.८५ | १९.३५ |

एन.पी.ए. साठी आवश्यक तरतूद रु.१९.३५ लाख असताना संस्थेने स्वेच्छेने प्रत्यक्ष तरतूद रु. ४६.१० लाख इतकी केली आहे. तसेच संस्थेने चालु आर्थिक वर्षात ''उत्पादित जिंदगी''(Performing Asset) वर ऑडीट निकषाप्रमाणे (०.२५% प्रमाणे) तरतुद रु. ९.७५ लाख इतकी केली असून संस्थेची स्थिती अधिकाधिक भक्कम केली आहे हे आपणांस कळविण्यास आनंद वाटतो.

## खेळते भांडवल : रु. ६५५७.६९ लाख

गतवर्षाअखेर संस्थेचे खेळते भांडवल रु. ५५६६.६६ लाख एवढे होते. अहवाल वर्षी संस्थेने सर्व क्षेत्रात भरीव कामगिरी केल्यामुळे खेळते भांडवल रु. ९९१.०३ लाखाने वाढून रु. ६५५७.६९ लाख इतके झाले आहे. वाढीचे शेकडा प्रमाण १७.८०% इतके आहे.

## संचालक मंडळ सभा :

संस्थेचा कारभार गतीमान होण्यासाठी अहवाल वर्षात संचालक मंडळाच्या एकूण १२ सभा होऊन एकूण २५० ठराव पारीत करण्यात आले. तसेच कर्ज मंजुरी समितीच्या एकूण ४५ सभा, कर्जवसुलीसमिती आणि मा. संचालक मंडळ व विविध समितींच्या मिळून एकूण १०६ सभा आवश्यकतेनुसार घेण्यात आल्या.

## सभासद, कर्मचारी व संचालक प्रशिक्षण :

अहवाल वर्षात संस्थेने आपल्या सभासदांसाठी महाराष्ट्र राज्य सहकारी संघ पुणे यांचे अंतर्गत ठाणे जिल्हा सहकारी बोर्ड लि. कल्याण यांचे मार्फत दि. १४/०२/२०१४ रोजी सभासद प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केला होता. या प्रशिक्षण वर्गात संस्थेच्या सभासदांनी सहभाग घेतला.

तंत्रज्ञानात सतत प्रगती होत असते, तसेच नियमांत वारंवार बदल होत असतात. आपले ज्ञान अद्यावत रहावे या हेतूने संस्थेने सर्व कर्मचारी व संचालक यांना अहवाल वर्षात महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन लि., यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधीनी पुणे, पुणे जिल्हा नागरी सहकारी पतससंस्था फेडरेशन पुणे, मुंबई विभागीय सहकारी पतसंस्था फेडरेशन मुंबई व शिवसह्याद्री सहकार प्रशिक्षण केंद्र नवी मुंबई अशा निरनिराळ्या प्रशिक्षण संस्थामार्फत चालविण्यात येणाऱ्या प्रशिक्षण वर्गात टप्प्या टप्प्याने पाठवून सर्वांना प्रशिक्षण देण्यात आले.

## नफा विभागणी : रु. ६५.७५ लाख

अहवालसाली एकूण खर्च व नियमानुसार कराव्या लागणाऱ्या तरतुदी वजा जाता रु.६५,७४,४३८.५२ नफा झालेला असून गतवर्षीचा शिल्लक नफा रु. ३५९.२८ मिळून नफा रु. ६५,७४,७९७.८० आहे. सदर नफ्याची विभागणी पुढीलप्रमाणे करण्याची शिफारस संचालक मंडळ करीत आहे. त्यास आपण मंजुरी द्यावी. ही नम्र विनंती.

| तपशील | | रक्कम रुपये |
|---|---|---|
| राखीव निधी (२५% प्रमाणे) | रु. | १६,४३,७००.०० |
| लाभांश (१०% प्रमाणे) | रु. | १९,७७,२००.०० |
| इमारत निधी | रु. | १५,००,०००.०० |
| लाभांश समानीकरण निधी | रु. | १,००,०००.०० |
| रौप्य महोत्सव निधी | रु. | ७८,५००.०० |
| सभासद कल्याण निधी | रु. | २,००,०००.०० |
| कर्मचारी कल्याण निधी | रु. | ७५,०००.०० |
| आकस्मिक निधी | रु. | ५,००,०००.०० |
| माहिती तंत्रज्ञान निधी | रु. | ५,००,०००.०० |
| पुढील वर्षासाठी शिल्लक नफा | रु. | ३९७.८० |
| एकूण | रु. | ६५,७४,७९७.८० |

## लेखापरिक्षण :

संस्थेचे सन २०१३-१४ या आर्थिक वर्षाचे वैधानिक लेखापरिक्षण श्री.व्ही.जी.शिंदे ॲण्ड कं. (चार्टर्ड अकौटंट) यांनी केले. त्यांनी संस्थेच्या कामकाजाबद्दल गौरवोद्गार काढले व संस्थेस **'अ'** वर्ग प्रदान केला. तसेच संस्थेचे सन २०१३-१४ या आर्थिक वर्षाची अंतर्गत हिशोब तपासणी श्री.बी.आर.सावंत ॲण्ड कं. (चार्टर्ड अकौटंट) यांनी केलेली असून त्यांनी संस्थेच्या कामकाजाबाबत वेळोवेळी मोलाचे मार्गदर्शन केले. याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत.

## उल्लेखनीय बाबी :

संस्थेने अहवाल वर्षात जे उल्लेखनीय उपक्रम राबविले त्याचा तसेच अन्य बाबींचा थोडक्यात परामर्श खालीलप्रमाणे :-

**१) संस्थेची वेबसाईड : www.parijatcreditsociety.com**

संस्थेचे सभासद खातेदार यांना संस्थेविषयी व संस्थेच्या विविध ठेव व कर्ज योजना विषयी कोणत्याही वेळी व कोठेही अधिक माहिती उपलब्ध करुन देण्याचा उद्देशाने संस्थेने स्वतःची **वेबसाईड www.parijatcreditsociety.com** तयार केली असून त्याचे औपचारिक उद्घाटन दि. ३१/१२/२०१३ रोजी मा. श्री. नारायण बांदल साहेब संचालक कुर्ला नागरिक सह. बँक यांच्या हस्ते करण्यात आले.

**२) सभासदांसाठी 'पॅनकार्ड' सुविधा :**

संस्थेने आपल्या सभासद-खातेदार यांचेसाठी भारत सरकारच्या आयकर विभागामार्फत दिले जाणारे **'पॅनकार्ड'** पारिजात संस्थे मार्फत देण्याबाबत सामजस्य करार केला. त्यामुळे पारिजात संस्थेच्या सभासद ठेवीदारांना पॅनकार्ड आता संस्थेमार्फत देण्याची सुविधा करण्यात आली. अशा प्रकारे पॅनकार्ड सुविधा पतसंस्थेच्या माध्यमातून देणारी **'पारिजात'** ही एकमेव व प्रथम संस्था आहे.

**३) वेस्टर्न युनियन मनी ट्रान्सफर एजन्सी (Western Union) :-**

जगातील २०८ देशात राहणाऱ्या भारतीयांकडुन देशात पाठविण्यात येणाऱ्या पैशाचे विनिमय केंद्र पारिजात को-ऑप. क्रेडिट सोसायटी मध्ये करण्यात येत आहे. वेस्टर्न युनियन (Western Union) तर्फे नवी मुंबईतील पतसंस्थामध्ये अशी सुविधा उपलब्ध होण्याचा मान सर्वप्रथम **'पारिजात'** संस्थेने मिळविला आहे.

**४) सर्वोत्तम शाखा पुरस्कार**

संस्थेच्या कर्मचारी वर्गास प्रोत्साहीत करण्यासाठी उल्लेखनिय कामगिरी करणाऱ्या शाखेस व कर्मचाऱ्यांस सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्रक देऊन गौरवण्यात येते. अहवाल वर्षात **"सर्वोत्तम शाखा"** पुरस्कार **वाशी** शाखेस प्राप्त झाला आहे.

**५) सर्वोत्तम दैनंदिन ठेव प्रतिनिधी पुरस्कार :**

मार्च २०१४ अखेर संस्थेकडे ११७ दैंनदिन ठेव प्रतिनिधी काम करीत आहेत. दैनंदिन ठेव वसुलीत उल्लेखनिय कामगिरी करणाऱ्या दैंनदिन ठेव प्रतिनिधीस संस्थेचा **"सर्वोत्तम दैनंदिन ठेव प्रतिनिधी"** म्हणुन सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्रक देऊन गौरवण्यात येते. अहवाल वर्षात मुंबई व पुणे विभागातुन सर्वोत्कृष्ट दैंनंदिन ठेव प्रतिनिधीचा मान चंदननगर शाखेचे ठेव प्रतिनिधी **श्री. विशाल प्रल्हाद सातव** यांना प्राप्त झाला आहे.

## आभार :

सहकार क्षेत्रास उत्तम वळण लागावे, सहकार चळवळ बळकट व्हावी यासाठी प्रयत्नशील असलेले महाराष्ट्र राज्याचे मा. सहकार आयुक्त व विशेष निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य, पुणे, मा. विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था कोकण विभाग, मा. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था ठाणे, मा. उपनिबंधक सहकारी संस्था पुणे, मा. उपनिबंधक सहकारी संस्था, ठाणे तालुका, ठाणे तसेच संस्थाकार्यक्षेत्रातील सहकारी खात्याचे विविध पदाधिकारी त्यांचेही संस्था ऋणी आहे.

संस्थेच्या कार्यक्षेत्रातील ठाणे जिल्हा सहकारी बोर्ड कल्याण, महाराष्ट्र राज्य सह.बँक लि., ठाणे जिल्हा मध्य.सह.बँक लि., नवी मुंबई को-ऑप.बँक लि., कॉसमॉस को-ऑप.बँक लि., नॅशनल को-ऑप.बँक लि., अभ्युदय को-ऑप.बँक लि., महानगर सह.बँक लि., राजर्षी शाहु सहकारी बँक लि., दि.सातारा सहकारी बँक लि., अपना सह.बँक लि.,कुर्ला नागरीक सह.बँक लि., पंजाब नॅशनल बँक लि., सारस्वत को-ऑप.बँक लि., कल्याण जनता सह. बँक लि., शामराव विठ्ठल को-ऑप. बँक लि., पंजाब ॲण्ड महाराष्ट्र को-ऑप. बँक लि., यांचे शाखाधिकारी व कर्मचारी यांची संस्था आभारी आहे.

संस्थेचे २०१३-२०१४ या आर्थिक वर्षाचे वैधानिक लेखापरिक्षक श्री.व्ही.जी.शिंदे (चार्टर्ड अकौटंट), अंतर्गत लेखापरिक्षक श्री.बी.आर.सावंत, सनदी लेखापाल संगणकासाठी मे. कॉमविझार्ड सिस्टमस्, तसेच संस्थेचे कायदेविषयक सल्लागार यांनी संस्थेला आस्थेने मार्गदर्शन केल्याबद्दल संस्था त्यांची आभारी आहे.

संस्थेच्या प्रगतीसाठी अहोरात्र झटणारे संस्थेचे कर्मचारी, दै.ठेव प्रतिनिधी, सभासद व ठेवीदार आणि हितचिंतकांनी दिलेले सहकार्य व प्रोत्साहन यामुळेच संचालक मंडळ यशस्वी वाटचाल करू शकले त्याबद्दल आपणा सर्वांचे पुन्हा मन:पुर्वक आभार मानुन आपल्या लोभाची व सहकार्याची वृद्धी व्हावी अशी प्रार्थना करतो.

## श्रद्धांजली :

अहवाल सालामध्ये भारतातील जे थोर नेते, संशोधक, शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ, साहित्यिक, पत्रकार, सैनिक, कलावंत शिक्षणतज्ञ,सामाजिक कार्यकर्ते, सहकार तज्ञ आपल्या संस्थेचे मान्यवर सभासद, ठेवीदार व हितचिंतक दिवंगत झालेले आहेत त्यांना ही सभा नम्रतापूर्वक अभिवादन करुन त्या सर्वांच्या पवित्र स्मृतीस भावपुर्ण श्रद्धांजली अर्पण करीत आहे.

जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!



आपला सहकारी

**कृष्णा धुमाळ**

(अध्यक्ष)

दि. ३१ मार्च २०१४

| सन २०१२-१३ रु. पैसे | भांडवल व देणी | | सन २०१३-१४ रु. पैसे |
|---|---|---|---|
| ५,००,००,०००.०० | **अधिकृत भाग भांडवल :** | | ५,००,००,०००.०० |
| १,९७,७२,०००.०० | **वसूल भाग भांडवल :** | | २,१७,४४,६००.०० |
| | **राखीव निधी व इतर निधी** | | |
| ७१,२५,४२१.०० | राखीव निधी | ८६,१६,९०९.०० | |
| १,२८,१५,२११.०० | इमारत निधी | १,६४,९६,८७८.०० | |
| ४२,६०,०००.०० | संशयित बुडीत कर्ज निधी | ४६,१०,०००.०० | |
| ५३,९९९.०० | धर्मादाय निधी | ५३,९९९.०० | |
| ३,३५,०००.०० | लाभांश समानिकरण निधी | ४,३५,०००.०० | |
| ७९,०४६.०० | सभासद कल्याण निधी | २,७०,७३९.०० | |
| १,१७,०००.०० | सेवक कल्याण निधी | १,६७,०००.०० | |
| ६,२८,१८७.०० | सहकार प्रशिक्षण निधी | ६,२८,२८८.०० | |
| १७,४२,०००.०० | आकस्मिक निधी | १७,४२,०००.०० | |
| १,६५,०००.०० | गुंतवणूक चढउतार निधी | १,६५,०००.०० | |
| २,९०,०००.०० | रौप्यमहोत्सव निधी | ३,५४,०००.०० | |
| ८,७५,०००.०० | उत्पादित कर्जावरील संभाव्य तरतुद | ९,७५,०००.०० | |
| १०,६३,०००.०० | माहिती तंत्रज्ञान निधी | १२,३८,९६३.०० | |
| ३,००,०००.०० | निवडणूक निधी | ३,००,०००.०० | ३,६०,५३,७७६.०० |
| | **सभासद ठेवी :** | | |
| ३,३४,६२,४५६.०५ | बचत ठेव | ४,३५,४५,१४९.७६ | |
| ११,५४,१८,९८८.०० | दैनंदिन बचत ठेव | १३,०८,२३,११४.०० | |
| २९,३५,२४१.०० | सभासद ठेव | २८,२७,७०३.०० | |
| ६,९६,२७,६०१.०० | अल्प मुदत ठेव | ५,७६,५६,१५८.०० | |
| ३,७२,२२,४६६.०० | मुदत ठेव | ४,६२,३८,९८१.०० | |
| २,०७,४२,७१८.०० | दामदुप्पट ठेव | २,५१,९७,२७९.०० | |
| २,०५,७९९.०० | पारिजात बक्षीस ठेव | १,४१,९६७.०० | |
| ३,९१,७३,८५०.०० | मासिक प्राप्ती ठेव | ४,४४,२१,१२५.०० | |
| ३०,४२,०६०.०० | आवर्त ठेव | ४०,५१,६९०.०० | |
| ४,५९,१०,७६७.०० | शुभकार्य ठेव | ४,४६,५७,३४५.०० | |
| १,६९,४४,०१८.०० | शुभलक्ष्मी ठेव | १,७९,०८,११४.०० | |
| ४,६२,४८,५६०.०० | धनवर्षा ठेव | ४,५२,४०,५१०.०० | |
| ४,५३,७८,०४५.०० | पारिजात ठेव | २,२३,०३९.०० | |
| १,७३,२५,८४७.०० | वैभव लक्ष्मी ठेव | ६,४५,०६,०७४.०० | |
| ०.०० | धनसंचय ठेव | २,६८,७६,०४८.०० | |
| ०.०० | धनसमृध्दी ठेव | २,७६,७३,०६६.०० | |
| ९८,०००.०० | धन लक्ष्मी ठेव | ०.०० | ५८,१९,८७,३६२.७६ |
| ५४,३३,५७,२८०.०५ | पुढील पानावर..... | | ६३,९७,८५,७३८.७६ |

## अखेरचे ताळेबंदपत्रक

| सन २०१२-१३ रु. पैसे | मालमत्ता व येणी | | सन २०१३-१४ रु. पैसे |
|---|---|---|---|
| | **रोख व बँक शिल्लक :** | | |
| ४,८४,६८९.५५ | रोख शिल्लक | २३,८३,६१३.८५ | |
| १४,५६,७३४.०६ | कॉसमॉस को-ऑप. बँक लि. | २७,३७,४०४.२१ | |
| ११,९१०.३० | महाराष्ट्र राज्य सह. बँक लि. | ११,५७८.३० | |
| २८,९६३.०० | ठाणे जिल्हा मध्य.सह.बँक लि. | २२,४३१.७३ | |
| ०.०० | सारस्वत को-ऑप. बँक लि. | १०,०१,१००.५१ | |
| ०.०० | शामराव विठ्ठल को-ऑप. बँक लि. | ११,९५,१९१.७० | |
| ९,४५,७३०.०० | नवी मुंबई को-ऑप.बँक लि. | ३७,३६,२५९.०० | |
| २९,३३,७५०.०१ | अभ्युदय को-ऑप.बँक लि. | ३१,३८,७५८.०५ | |
| १२,०३,३८१.४५ | नॅशनल को-ऑप. बँक लि. | ९,९९,६७०.४५ | |
| ३,९०,७७४.०० | राजश्री शाहू सहकारी बँक लि. | ६,११,१७२.०० | |
| ९,०६६.०० | सातारा सहकारी बँक लि. | ४,२२,३९०.६५ | |
| ९,५४,६६५.०० | महानगर को-ऑप.बँक लि. | ४०,१४७.०० | |
| ४,९००.०० | पंजाब नॅशनल बँक लि. | ५,०३४.०० | |
| ५,३२,५८३.६२ | कल्याण जनता सहकारी बँक लि. | २,००,४२२.०० | |
| ४३,४१९.०० | अपना सहकारी बँक लि. | ९,९४६.४० | १,६५,१५,११९.८५ |
| | **गुंतवणूक :** | | |
| १,०००.०० | ठाणे जिल्हा मध्य सहकारी बँक -भाग | १,०००.०० | |
| ३,०००.०० | महा.राज्य सह.पत.फेडरेशन-भाग | ३,०००.०० | |
| ७५,८२,९५८.०० | ठाणे जि.म.सह.बँक -राखीव व इतर निधी | १,२१,५६,७७८.०० | |
| ३९,५१,०३७.०० | महा.राज्य सह.बँक - राखीव व इतर निधी | २३,७३,६२५.०० | |
| २,९७,५९,४२६.०० | नवी मुंबई को-ऑप.बँक - मुदत व आर्वत ठेव | १,८९,८५,६२०.०० | |
| ७१,००,०००.०० | नॅशनल को-ऑप. बँक - मुदत ठेव | १,४१,७५,०००.०० | |
| ०.०० | शामराव विठ्ठल को-ऑप. बँक - मुदत ठेव | २,०५,१५,०००.०० | |
| ५,००,०७,५००.०० | अभ्युदय को-ऑप. बँक - मुदत व आर्वत ठेव | ४,२९,१०,०००.०० | |
| १,३०,००,०००.०० | सारस्वत को-ऑप. बँक - मुदत ठेव | २,६५,००,०००.०० | |
| १,४२,०३,१६१.०० | अपना सह. बँक लि.- मुदत ठेव | १,७५,०४,७५०.०० | |
| ९३,००,०००.०० | महानगर को-ऑप. बँक लि.- मुदत ठेव | ३,१८,७५,०००.०० | |
| ५०,००,०००.०० | कुर्ला नागरिक सहकारी बँक लि.- मुदत ठेव | ५०,००,०००.०० | |
| ४०,००,०००.०० | पंजाब ॲन्ड महाराष्ट्र बँक - मुदत ठेव | ६५,००,०००.०० | |
| २२,००,०००.०० | कल्याण जनता सहकारी बँक लि.- मुदत ठेव | ३७,००,०००.०० | |
| २०,००,०००.०० | कॉसमॉस को-ऑप. बँक - मुदत ठेव | ०.०० | |
| २५,००,०००.०० | सातारा सहकारी बँक लि.- मुदत ठेव | ०.०० | |
| ५०,००,०००.०० | संत सोपानकाका सहकारी बँक लि.- मुदत ठेव | ०.०० | २०,२१,९९,७७३.०० |
| | **सभासद कर्जे :** | | |
| १,९९,९५,३९३.०० | वैयक्तिक /जामिनकी कर्ज | १,७५,७६,४५९.०० | |
| ७०,४०,०२९.०० | वाहन तारण कर्ज | ७५,१६,७९६.०० | |
| २६,२८,१९,९७६.०० | सुरक्षित तारण कर्ज | ३०,३८,९९,६५९.०० | |
| ३३,५८,९२१.०० | इतर तारण कर्ज | ३१,०८,९४०.०० | |
| ७,८६,१४२.०० | शासकीय रोखे कर्ज | ६,१७,६९०.०० | |
| ६९,३१,६३०.०० | दावा दाखल कर्जे | ५८,९९,५८२.०० | |
| १६,४६,०८,६४८.३९ | पुढील पानावर..... | | २१,८७,१४,८९२.८५ |

दि. ३१ मार्च २०१४

| सन २०१२-१३ रु. पैसे | भांडवल व देणी | | सन २०१३-१४ रु. पैसे |
|---|---|---|---|
| ५४,३३,५७,२८०.०५ | मागील पानावरुन....... | | ६३,९७,८५,७३८.७६ |
| | **इतर देणी** | | |
| २१,२५,५२८.०० | ठेवीवरील देय व्याज | २३,१२,५४९.०० | |
| १५,११,२७९.०० | लाभांश देणे | १६,४९,२६५.०० | |
| १,००,०००.०० | सिक्युरिटी डिपॉझीट | १,००,०००.०० | |
| ५३,०७४.०० | अधिभार (सरचार्ज) देणे | ६१,३२८.०० | |
| १,६५०.०० | शेअर्स अनामत खाते | ५५०.०० | ४१,२३,६९२.०० |
| | **इतर तरतूदी :** | | |
| ९,६००.०० | व्यवसाय कर | १०,३५०.०० | |
| ८७,५९९.०० | आयकर टी.डी. एस. | १,०९,१६४.०० | |
| ६९,८३०.०० | सेवक भविष्य निर्वाह निधी | १,०७,५६९.०० | |
| ४,२१,७०१.०० | लेखापरिक्षण फी | ५,१४,६७७.०० | |
| ५,०००.०० | शिक्षण निधी | ५,०००.०० | |
| ६,१६६.०० | कर्मचारी विमा हप्ता | ८,०८१.०० | |
| १२,५००.०० | टेलिफोन बिल | १२,०५०.०० | |
| ३९,०००.०० | विज बिल | ३२,५००.०० | |
| ४९,०००.०० | व्यवसायिक फी | ६,०००.०० | |
| ४२,३७३.०० | इतर देणी | २,८९,४८४.०० | |
| ८०,०००.०० | आयकर तरतूद | १,९०,०००.०० | १२,८४,८७५.०० |
| ४०,००,०००.०० | **थकीत व्याज निधी तरतूद :** | | ४०,००,०००.०० |
| | **नफा तोटा खाते :** | | |
| १०४.२२ | मागील वर्षाचा शिल्लक नफा | ३५९.२८ | |
| ४६,९४,०८१.०६ | अधिक : चालू वर्षाचा नफा | ६५,७४,४३८.५२ | ६५,७४,७९७.८० |
| ५५,६६,६५,७६५.३३ | एकूण | | ६५,५७,६९,१०३.५६ |

| | | |
|---|---|---|
| मे. व्ही.जी. शिंदे अॅन्ड कं. | मे. बी. आर. सावंत अॅन्ड कं. | श्री. तानाजी गु. शिंदे |
| चार्टर्ड अकौटंट -वैधानिक लेखापरिक्षक | चार्टर्ड अकौटंट -अंतर्गत लेखापरिक्षक | व्यवस्थापक |

## अखेरचे ताळेबंदपत्रक

| सन २०१२-१३ रु. पैसे | मालमत्ता व येणी | | सन २०१३-१४ रु. पैसे |
|---|---|---|---|
| १६,४६,०८,६४८.३९ | मागील पानावरुन........ | | २१,७८,१४,८९२.८५ |
| १८,७१,४८८.०० | कर्मचारी वैयक्तिक कर्ज | ३१,६७,२७६.०० | |
| १,८९,०५१.०० | कर्मचारी वाहन तारण कर्ज | १,७८,८५१.०० | |
| ३७,७३,३४४.०० | कर्मचारी घरतारण कर्ज | ४९,२०,९६२.०० | |
| २६,३६,३०६.०० | दैनंदिन ठेव प्रतिनिधी कर्ज | २२,४२,९३८.०० | |
| ४,५१,४५,५४९.०० | ठेव तारण कर्ज | ४,७४,०९,८०५.०० | |
| ७०,८०,४९६.०० | सोने तारण कर्ज | ५२,३७,०८१.०० | ४०,१७,७६,०३९.०० |
| | **मालमत्ता :** | | |
| ३९,३८,४४१.०० | फर्निचर व फिक्चर्स खाते | ३६,२७,३६६.०० | |
| ५,९८,२०३.०० | संगणक खाते | ६,८६,६०२.०० | |
| १,४५,८९५.०० | वातानुकूलीत यंत्रे खाते | १,४१,६७७.०० | |
| ३,७६,७०१.०० | इलेक्ट्रीक साधन सामुग्री खाते | ३,३९,०३०.०० | |
| २,०४,३६८.०० | कार्यालय साधन सामुग्री खाते | २,६१,३०६.०० | |
| १,०१,२७,००२.०० | इमारत खाते | ९८,२०,६५२.०० | |
| ४४,९५६.०० | डेली कलेक्शन मशिन खाते | ३१,४६९.०० | |
| ७,४८३.०० | ग्रंथालय खाते | ६,९२८.०० | |
| ३६,३६६.०० | इनव्हर्टर खाते | ५७,११९.०० | |
| ५,०५३.०० | मोबाईल फोन खाते | ३,५३७.०० | १,४९,८३,६८६.०० |
| | **येणे व्याज :** | | |
| ३९,८५,४०५.०० | सभासद कर्जावरील येणे व्याज | ३७,९४,१६०.०० | |
| ९१,७६,७८५.०० | गुंतवणूकीवरील येणे व्याज | १,४३,१०,४१३.०० | १,८१,०४,५७३.०० |
| | **इतर येणी :** | | |
| ९,२०,०००.०० | कार्यालय अनामत | ९,२०,०००.०० | |
| १२,५५०.०० | दुरध्वनी सुरक्षा ठेव | १२,५५०.०० | |
| ४२,२६०.०० | वीज सुरक्षा ठेव | ४२,२६०.०० | |
| ३,५००.०० | पाणी कनेक्शन सुरक्षा ठेव | ३,५००.०० | |
| ५,०००.०० | बि.ई.एस.टी. सुरक्षा ठेव | ५,०००.०० | |
| २,८९,६२८.९६ | स्टेशनरी स्टॉक | ३,३४,६७२.०३ | |
| ४,६००.०० | मुद्रांक साठा | ५,८००.०० | |
| ५३,६७५.०० | आगाऊ विमा | ६१,७४०.०० | |
| ३,२७१.०० | पॅनकार्ड कुपन्स स्टॉक | ३,३७८.०० | |
| १,५०,८७६.०० | आयकर (२०१०-११ ते २०१२-१३) | ४,८६,५७६.०० | |
| १,८७,७४१.०० | कार्यालय नुतनीकरण खर्च | १,३३,१०६.०० | |
| ३६,०१७.०० | आगाऊ खर्च | १२,८७०.०० | |
| २२,७२४.९८ | टी.डी.एस. व इतर येणे खाते | ४९,६१०.६८ | २०,७१,०६२.७१ |
| | **ॲडव्हान्स :** | | |
| ५०,३००.०० | दै.ठेव प्रतिनिधी मशीन ॲडव्हान्स | | १,९८,८५०.०० |
| ५५,६६,६५,७६५.३३ | एकूण | | ६५,५७,६९,१०३.५६ |

| श्री. दिपक शं. टेळे | श्री. बाळासाहेब वि. ताकवले | श्री. कृष्णा पां. धुमाळ |
|---|---|---|
| खजिनदार | सचिव | अध्यक्ष |

दि. ३१ मार्च २०१४

| सन २०१२-१३ रु. पैसे | खर्च | सन २०१३-१४ रु. पैसे |
|---|---|---|
| ३,१५,१२,८९९.०० | सभासद ठेवीवरील व्याज | ३,७४,४८,६४१.०० |
| ९,२५,८४०.०० | अधिकर्ष व्याज खर्च | ३,९४,४५८.०० |
| ७२,८६,९३३.०० | कर्मचारी पगार, बोनस व भत्ते | ९८,८२,२३८.०० |
| ४,२९,७३२.०० | कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संस्था अंशदान | ६,७५,७६७.०० |
| १,०४,५२४.०० | कर्मचारी ग्रुप ग्रॅज्युईटी (एल.आय.सी.) खर्च | ३,९५,९४४.०० |
| ९७,८१,३६७.०० | दैंनदिन ठेव प्रतिनिधी कमिशन | १,१०,६०,९८२.०० |
| ८,५१,७२२.०० | कार्यालय भाडे | ८,९६,५७५.०० |
| ४,८०,५२५.२० | स्टेशनरी व दिनदर्शिका छपाई खर्च | ५,४४,६९५.१० |
| ६२,७९०.०० | वार्षिक अहवाल छपाई खर्च | ७०,५६०.०० |
| १,९७,६५८.०० | किरकोळ खर्च | २,०८,१२१.०० |
| ५,२९,७०३.०० | विज खर्च | ५,३२,७१२.०० |
| १,४८,०२५.०० | टेलिफोन खर्च | १,४८,८६४.०० |
| २,२४,४७७.०० | प्रवास खर्च | २,२२,४२३.०० |
| ८०,५६०.०० | विमा खर्च | ८७,८९१.०० |
| ८,४६९.०० | टपाल खर्च | ९,६७९.०० |
| १,५७,३९८.०० | कार्यालय दुरुस्ती व देखभाल खर्च | २,६१,९३७.०० |
| ७,१७५.०० | कार्यालय पाणी बिल खर्च | ६,२५८.०० |
| ३१,१४०.०० | संगणक देखभाल व दुरुस्ती खर्च | २६,५८१.०० |
| ३,१४,८४०.०० | संगणक दुरुस्ती व देखभाल (A.M.C.) | ३,४१,९५९.०० |
| ७,६००.०० | कार्यालय साफसफाई (A.M.C.) | १८,०७५.०० |
| २६,४००.०० | वातानुकूलीत यंत्रे (A.M.C.) | १४,८९१.०० |
| २५,९०९.०० | कार्यालय मालमत्ता कर व देखभाल शुल्क खर्च | ३९,९४८.०० |
| ८४,९४५.५० | कार्यालय साफसफाई खर्च | ९४,५०८.०० |
| ४,००,०००.०० | लेखापरिक्षण फी (शासकीय/ अंतर्गत) | ४,७५,०००.०० |
| ५२,४१८.०० | व्यावसायिक व कायदे विषयक सल्लागार फी | ३६,३४०.०० |
| २,५००.०० | व्यवसाय कर खर्च संस्था | २,५००.०० |
| ३,०००.०० | सभासद व वर्गणी | १,०००.०० |
| १३,३४०.०० | दिपावली भेट खर्च | १४,१९०.०० |
| ९९,९७६.०० | पुजा खर्च | १,०८,७५७.०० |
| ५६,८३७.८६ | बॅंक चार्जेस खर्च | ४०,२१८.१६ |
| ३९,४५५.०० | सर्विस टॅक्स खर्च | ४२,३५२.४२ |
| ५,३९,४८,१५८.५६ | पुढील पानावर... | ६,४१,०४,०६४.६८ |

## अखेरचे नफा-तोटा पत्रक

| सन २०१२-१३ रु. पैसे | उत्पन्न | सन २०१३-१४ रु. पैसे |
|---|---|---|
| ५,०४,९५,६१०.०० | सभासद कर्जावरील व्याज | ५,४४,००,११५.०० |
| १,२७,६२,८८१.४० | गुंतवणुकीवरील व्याज | १,७६,०२,३८३.७० |
| ८,८७,५९८.०० | कर्ज प्रोसेसिंग चार्जेस | ४,६७,९९१.०० |
| २,०५,१६१.०० | कर्ज वसुली चार्जेस जमा | १,४८,४९८.०० |
| ५२,१८०.०० | फॉर्म फी, स्टेशनरी चार्जेस इ. | ४८,०१५.०० |
| १५०.०० | लाभांश | १५०.०० |
| ६,२३,९७९.३० | इतर जमा | ८,२८,९६५.५० |
| ६,५०,२७,५५९.७० | पुढील पानावर... | ७,३४,९६,११८.२० |

दि. ३१ मार्च २०१४

| सन २०१२-१३ रु. पैसे | खर्च | सन २०१३-१४ रु. पैसे |
|---|---|---|
| ५,३९,४८,१५८.५६ | मागील पानावरुन....... | ६,४१,०४,०६४.६८ |
| ४६,६५०.०० | कर व परवाना फी | १०,०४०.०० |
| ९८,९५०.०० | वार्षिक सर्वसाधारण सभा खर्च | १,२७,९२७.०० |
| ३७,९१३.०० | प्राथमिक खर्च निर्लेखित | ०.०० |
| १,२१,८००.०० | संचालक सभा भत्ता खर्च | १,११,३००.०० |
| ३,३७५.०० | सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट चार्जेस | २,२२५.०० |
| ७७,६९१.०० | भेट व तपासणी खर्च | ९५,७६२.०० |
| ८,६३०.०८ | लॉकर भाडे | ७,२९५.०० |
| ६५,२९६.०० | कर्ज वसुली खर्च | २१,४४२.०० |
| १५,०११.०० | जाहिरात खर्च | १,००,७०९.०० |
| १,७६,५१६.०० | सिक्युरिटी गार्ड खर्च | १,९९,५५१.०० |
| १,१३,३६१.०० | मालमत्ता विक्रीतील तुट खर्च | ४९,२०८.०० |
| ५४,६३५.०० | कार्यालय नुतनीकरण निर्लेखन खर्च | ५४,६३५.०० |
| ५,०००.०० | शिक्षण निधी खर्च | ५,०००.०० |
| १,२५,०००.०० | उत्पादित कर्ज संभाव्य तरतूद | १,००,०००.०० |
| ५,००,०००.०० | संशयित व बुडित कर्ज निधी तरतूद | ३,५०,०००.०० |
| ५,००,०००.०० | सहकार प्रशिक्षण निधी तरतुद | २,००,०००.०० |
| ८०,०००.०० | आयकर तरतूद | १,१०,०००.०० |
| १०,००,०००.०० | माहिती आणि तंत्रज्ञान निधी तरतूद | २,००,०००.०० |
| ६,९८,०००.०० | थकीत व्याज निधी तरतूद | ०.०० |
| १०,००,०००.०० | आकस्मिक देणी तरतुद | ०.०० |
| ३,००,०००.०० | निवडणूक निधी तरतुद | ०.०० |
| २,००,०००.०० | रौप्य महोत्सव निधी तरतुद | ०.०० |
| ११,५७,४९२.०० | घसारा | १०,७२,५२१.०० |
| ४६,९४,०८१.०६ | निव्वळ नफा ताळेबंदास वर्ग | ६५,७४,४३८.५२ |
| ६,५०,२७,५५९.७० | एकूण | ७,३४,९६,११८.२० |

| मे. व्ही.जी. शिंदे अॅन्ड कं. | मे. बी. आर. सावंत अॅन्ड कं. | श्री. तानाजी गु. शिंदे |
|---|---|---|
| चार्टर्ड अकौटंट -वैधानिक लेखापरिक्षक | चार्टर्ड अकौटंट -अंतर्गत लेखापरिक्षक | व्यवस्थापक |

## अखेरचे नफा-तोटा पत्रक

| सन २०१२-१३ रु. पैसे | उत्पन्न | सन २०१३-१४ रु. पैसे |
|---|---|---|
| ६,५०,२७,५५९.७० | मागील पानावरुन........ | ७,३४,९६,११८.२० |
| ६,५०,२७,५५९.७० | एकूण | ७,३४,९६,११८.२० |

| श्री. दिपक शं. टेळे | श्री. बाळासाहेब वि. ताकवले | श्री. कृष्णा पां. धुमाळ |
|---|---|---|
| खजिनदार | सचिव | अध्यक्ष |

## वैधानिक लेखापरीक्षकाचा अहवाल : (सन २०१३-१४)

(महाराष्ट्र सहकारी संस्थाचे कायदा कलम ८१ (५-ब) आणि महाराष्ट्र सहकारी संस्थाचे नियम ६९ अन्वये द्यावयाचा)

आम्ही **पारिजात को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि. नवी मुंबई,** या संस्थेचे दि. ३१.०३.२०१४ रोजीचे ताळेबंद पत्रक व त्याच दिवशी संपलेल्या नफा तोटा पत्रकाचे वैधानिक लेखा परिक्षण करुन सोबत जोडलेली आहेत. हि हिशोबी पत्रके तयार करण्याची जबाबदारी संस्थेच्या व्यवस्थापनाची आहे. या अर्थिक पत्रकाचे लेखा परिक्षण करुन त्यावर मत प्रदर्शित करण्याची आमची जबाबदारी आहे.

साधारणात : भारतामध्ये स्विकृत झालेल्या लेखापरिक्षण मान्यतानुसार आम्ही संस्थेचे लेखापरिक्षण केलेले आहे. या लेखापरिक्षण मान्यतानुसार आम्ही लेखापरिक्षण कार्यक्रम आखून व त्याप्रमाणे काम करुन विश्वासपूर्वक असे पाहिले आहे की, सदर आर्थिक पत्रकांत कोणतेही महत्वाचे दोष राहू नयेत. लेखापरिक्षणात चाचणी तपासणी तसेच आर्थिक पत्रकांतील रक्कमांच्या संदर्भात कागदपत्रे तपासून या रक्कमा पत्रकात योग्यरित्या दाखविलेल्या असल्याबद्दलची खात्री करणे. त्याचप्रमाणे मान्यता प्राप्त लेखांकन सिध्दांताप्रमाणे आर्थिक पत्रकांचे मुल्यांकन अनुमान आणि तसेच हि आर्थिक पत्रके संस्थेच्या व्यवस्थापनाने महत्त्वपूर्ण अनुमानाप्रमाणे प्रस्तुत केल्याबद्दलचे मुल्यांकन या लेखापरिक्षणात समाविष्ट आहे, त्यामुळे आम्ही केलेल्या लेखापरिक्षणाप्रमाणे वाजवीरित्या मत प्रदर्शित करण्याबद्दल आम्हांला खात्री आहे. त्याप्रमाणे आम्ही अभिप्राय देतो की :-

१) आमच्या लेखापरिक्षणाच्या संदर्भात, आमच्या ज्ञानाप्रमाणे आणि विश्वासाप्रमाणे, आम्ही संस्थेकडून मागितलेली सर्व माहिती व स्पष्टीकरणे आम्हाला समाधानकारक वाटली.

२) संस्थेची ताळेबंद आणि नफा-तोटा पत्रके हि महाराष्ट्र सहकारी सोसायटयांच्या कायदा व त्याखालील नियमांनुसार तयार केलेली आहेत.

३) संस्थेची ताळेबंद पत्रके आणि नफा-तोटा पत्रके हि संस्थेच्या हिशोबी पुस्तके व विवरणे या बरोबर मिळती जुळती आहेत.

४) आमच्या मते मला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार त्याचप्रमाणे या आर्थिक पत्रकावर दिलेल्या स्वतंत्र टिपणीनुसार आणि अलहिदा दिलेल्या शेऱ्यास पात्र राहुन तसेच भारतामध्ये साधारणत:स्विकृत असलेल्या लेखापरिक्षण मान्यतानुसार

अ) ताळेबंद पत्रक सोसायटीची दि. ३१ मार्च २०१४ ची खरी व योग्य स्थिती दर्शविते आणि

ब) नफा-तोटा पत्रक दि. ३१ मार्च २०१४ रोजी संपलेल्या वर्षाचा खरा व योग्य नफा दर्शविते.

५) सन २०१३-१४ सालाकरिता संस्थेस लेखापरिक्षण वर्ग **'अ'** देण्यात आला आहे.

६) वरील दाखला प्रसारीत करण्यांत येणाऱ्या लेखापरिक्षण प्रतिवृत्तांवरील विभाग 'अ' 'ब' 'क' मधील शेऱ्यास पात्र राहून देण्यात येत आहे.

**व्ही.जी.शिंदे आणि कं.**
चार्टर्ड अकौंटंट
सही
व्ही.जी. शिंदे
प्रोप्रायटर

स्थळ : नवी मुंबई
दिनांक : १९/७/२०१४

## अंदाज पत्रक सन २०१४-२०१५

(रु.लाखात)

| उत्पन्न तपशिल | अंदाजे उत्पन्न २०१३-२०१४ | प्रत्यक्ष उत्पन्न २०१३-२०१४ | अंदाजे उत्पन्न २०१४-२०१५ |
|---|---|---|---|
| कर्जावरील व्याज | ६११.५० | ५४४.०० | ६२९.६९ |
| गुंतवणुकीवरील व्याज | १५६.९८ | १७६.०३ | २०८.०० |
| इतर उत्पन्न | १८.३४ | १४.९३ | १६.९६ |
| एकूण रु. | ७८६.८२ | ७३४.९६ | ८५४.६५ |

| खर्च तपशिल | अंदाजे उत्पन्न २०१३-२०१४ | प्रत्यक्ष उत्पन्न २०१३-२०१४ | अंदाजे उत्पन्न २०१४-२०१५ |
|---|---|---|---|
| सभासद ठेवीवरील व्याज | ४०१.३७ | ३७४.४९ | ४३८.१५ |
| कर्मचारी पगार, बोनस, भ.निर्वाह निधी व ग्रज्युईटी खर्च* | १०५.४० | १०९.५४ | ११४.८५ |
| दैंनदिन ठेव प्रतिनिधी कमिशन | ११३.०० | ११०.६१ | १२०.०० |
| छपाई व स्टेशनरी, अहवाल व कॅलेंडर छपाई खर्च | ७.५० | ६.१६ | ७.५० |
| वार्षिक सभा व संचालक भत्ता खर्च | ३.०० | २.३९ | ३.०० |
| प्रवास, किरकोळ, दिवाळी भेट, गणवेश, व्हिजीट खर्च | ९.१० | ५.४० | ८.५० |
| विमा व पोस्टेज खर्च | १.७५ | ०.९८ | १.७५ |
| विज, फोन, पाणी, मालमत्ता कर, कार्यालय भाडे, सर्विस टॅक्स, लायसन्स फी व मेंटनन्स चार्जेस इ. | १९.८१ | १६.७७ | २०.२१ |
| देखभाल व दुरुस्ती, उद्घाटन, पुजा, साफसफाई खर्च, सिक्युरिटी गार्ड खर्च | १०.५० | ७.२० | १२.०० |
| ऑडीट फी खर्च | ५.५० | ४.७५ | ५.८० |
| AMC वर्गणी, व्यवसाय कर कायदेशीर सल्लागार फी व ब्रोकरेज | ६.१५ | ४.१५ | ८.५० |
| ओव्हर ड्राफ्ट कर्ज व्याज, बँक चार्जेस व लॉकर भाडे | १०.१९ | ४.४१ | ७.३६ |
| कर्ज वसुली व जाहिरात खर्च | ४.५० | १.२१ | ३.२० |
| घसारा खर्च | ११.०० | १०.७३ | १०.५० |
| तरतूदी (Education fund, Std. Ass.Prov., BDDR, OIR, Stf Praning, Incometax, Information Tec.prov., Contigencyfund) | २१.०५ | ८.५५ | १२.०५ |
| अन्य खर्च (सॉफ्ट.डेव्ह., संगणक दुरुस्ती, प्रशिक्षण खर्च) | ४.५० | १.८७ | ३.५० |
| नफा | ५२.५० | ६५.७५ | ७७.७८ |
| एकूण रु. | ७८६.८२ | ७३४.९६ | ८५४.६५ |

* अंदाजापेक्षा अधिक झालेल्या खर्चास मा. संचालक मंडळाने मंजुरी दिली असून वार्षिक सर्वसाधारण सभेच्या मंजुरीसाठी शिफारस करीत आहोत.

## संचालक कर्जाचा तपशिल :

| ३१-०३-२०१४अखेर येणे कर्ज | ३१-०३-२०१४अखेर थकबाकी | थकबाकीचे प्रमाण |
|---|---|---|
| ७५,१६,४९२.०० | ०.०० | ०.०० |

## संचालक नातेवाईक कर्जाचा तपशिल :

| ३१-०३-२०१४अखेर येणे कर्ज | ३१-०३-२०१४अखेर थकबाकी | थकबाकीचे प्रमाण |
|---|---|---|
| ६३,७१,१८३.०० | ०.०० | ०.०० |

## संस्थेची गत पाच वर्षातील आर्थिक प्रगती

| सन | २००९-२०१० | २०१०-२०११ | २०११-२०१२ | २०१२-२०१३ | २०१३-२०१४ |
|---|---|---|---|---|---|
| भाग भांडवल | १,३५,७९,९०० | १,५७,८८,८०० | १,७५,७८,५०० | १,९७,७२,००० | २,१७,४४,६०० |
| गुंतवणूक | ७,२८,२६,२२७ | ९,०२,६२,०९४ | १०,४१,३८,००९ | १५,५६,०८,०८२ | २०,२१,९९,७७३ |
| ठेवी | २९,२४,१६,८२७ | ३४,९७,६८,८३३ | ४०,०५,६६,५७५ | ४९,३७,३६४१६ | ५८,१९,८७,३६२ |
| कर्जे | २१,६२,२१,६६७ | २६,३१,३४,३७८ | ३१,०७,२८,८०७ | ३६,१६,२८,३१५ | ४०,१७,७६,०३९ |
| खेळते भाग भांडवल | ३२,६५,३४,६५८ | ३९,२१,५१,७१२ | ४५,१०,५८,६०१ | ५५,६६,६५,७६५ | ६५,५७,६९,१०३ |

## सभासदांना सूचना :

- सभासदाने आपला पत्ता बदलल्यास नवीन पत्त्याविषयी कार्यालयास लेखी सुचना त्वरीत करावी.
- ज्या सभासदांनी आपले वारस नेमले नसतील त्यांनी आपले वारस नेमून घ्यावेत.
- सर्व सभासदांचे लाभांश व भाग दाखले तयार आहेत ते संबंधीत शाखेतून घेऊन जावेत.
- कर्ज मागणी करताना सभेपूर्वी ३ दिवस अगोदर कर्ज मागणी अर्ज शाखेत जमा करावेत.
- पूर्ण भरलेले व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केलेले अर्ज कर्ज मंजूर सभेत ठेवले जातील.
- आपण घेतलेल्या कर्जाचे हप्ते वेळेवर भरा व संस्थेस सहकार्य करा.
- प्रत्येक महिनाच्या शेवटी आपले कर्ज, दैनंदिन ठेव, आर.डी.या बाबतचे पासबुकावर संस्थेत येऊन अधिकाऱ्यांची सही घ्यावी.
- संस्थेच्या व सभासदांच्या हिताच्या दृष्टीने आपला सल्ला व मार्गदर्शन लेखी स्वरुपात कळवा.

# परिशिष्ट - 'अ'

| | | |
|---|---|---|
| संस्थेचे नांव | : | **पारिजात को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., नवी मुंबई** |
| प्रशासकीय कार्यालय | : | पारिजात भवन, प्लॉट न. १८, सेक्टर १०ए, नेरुळ (प.), नवी मुंबई- ४०० ७०६. |
| नोंदणी क्रमांक | : | टी.एन.ए./(टी.एन.ए.)/आर.एस.आर. (सी.आर.)/ ९५१-९७ |
| कार्यक्षेत्र | : | बृहन्मुंबई, ठाणे, रायगड व पुणे जिल्हा |
| शाखा | : | नऊ (प्रशासकीय कार्यालय व्यतिरिक्त नऊ शाखा) |
| सभासद संख्या | : | ७८८६ |
| अधिकृत भाग भांडवल | : | रु. ५,००,००,०००.०० |
| वसुल भाग भांडवल | : | रु. २,१७,४४,६००.०० |
| राखीव व इतर निधी | : | रु. ३,६०,५३,७७६.०० |
| ठेवी | : | रु. ५८,१९,८७,३६२.०० |
| कर्जे | : | रु. ४०,१७,७६,०३९.०० |
| बाहेरील कर्जे | : | नाही |
| गुंतवणूक | : | रु. २०,२१,९९,७७३.०० |
| लेखापरिक्षण वर्ग | : | **''अ''** |
| अहवाल सालातील नफा | : | रु. ६५,७४,७९७.८० |
| कर्मचारी वर्ग | : | ५२ |
| खेळते भांडवल | : | रु. ६५,५७,६९,१०३.५६ |

## उपविधी पोटनियम दुरुस्ती :

(उपविधी पोटनियम दुरुस्ती क्र. अ.-३, क -८, व ५३ परिशिष्ठ क्र. ४)

| उपविधीचा अनुक्रमांक | सध्याच्या उपविधीची शब्दयोजना | दुरुस्त उपविधीची शब्दयोजना | दुरुस्तीचे कारण |
|---|---|---|---|
| नियम अ - ३ | संस्थेचे कार्यक्षेत्र :- संस्थेचे कार्यक्षेत्र ठाणे, बृहन्मुंबई, रायगड व पुणे जिल्ह्या पुरते मर्यादित आहे. | संस्थेचे कार्यक्षेत्र :- संस्थेचे कार्यक्षेत्र ठाणे, बृहन्मुंबई रायगड, पुणे व सातारा जिल्ह्यापुरते मर्यादित राहील. | बरेचसे सभासद व्यवसायानिमित्त सातारा जिल्ह्यात स्थायिक झाल्याने व ग्रामीण भागात सभासदांना बचतीस प्रोत्साहन देणे तसेच गरजुना कर्ज वितरण करणे व कर्ज वसुली करणेसाठी |
| नियम क - ८ | ठेवी व कर्जे : कर्जे व ठेवीच्या रुपाने उभारल्या जाणाऱ्या एकुण निधींची मर्यादा महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ च्या नियम ३५ नुसार केली जाईल. म्हणजेच एकुण स्वनिधीच्या १० पटीपेक्षा अधिक इतक्या रक्कमेची जबाबदारी पत्करणार नाही. | कर्जे व ठेवीच्या रुपाने उभारल्या जाणाऱ्या एकुण निधीची मर्यादा महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ च्या नियम ३५ नुसार केली जाईल. म्हणजेच एकुण स्वनिधीच्या १५ पटीपेक्षा अधिक इतक्या रक्कमेची जबाबदारी पत्करणार नाही. | १. ठेवी स्विकारण्यावर मर्यादा येत असल्यामुळे संस्थेच्या भविष्यातील विकास व वाढीसाठी तसेच सभासदाच्या आर्थिक गरजांची पुर्तता करण्यासाठी<br>२. सहकार आयुक्त कार्यालय जा. क्र. १४२९ ना. बँका/डी-४/पतसंस्था/स्वनिधी/२००९ दि. १३ ऑगस्ट २००९ या परिपत्रकान्वये मा. निबंधकाची मंजुरी आवश्यक |
| नियम ५३ परिशिष्ट क-४ | ड. व्यावसायिक कर्ज : व्यावसायिक कर्जाची मुदत जास्तीत जास्त ८४ महिने राहील. | व्यवसायिक कर्जाची मुदत जास्तीत जास्त १८० महिने राहील. | नवीन आदर्श उपविधी २०१३ नुसार कर्जाची महत्तम मर्यादा रु. ४०,०० लाख असल्यामुळे व सभासदांची मुदत वाढीची मागणी असल्याने त्यांच्या गरजांची पुर्तता करता यावी म्हणून. |
| नियम ५३ परिशिष्ट क-४ | ऐ. अस्तित्वात नाही पगार कपात तारण कर्ज | जो सभासद आपल्या पगारातुन कर्ज परत फेडीची हमी/वसुली देईल असा सभासदांसाठी पगार कपात तारण कर्जाची जास्तीत जास्त कर्ज मर्यादा रु. ३.०० लाख राहील. | १. सभासदांची मागणी असल्याने त्यांच्या गरजांची पुर्तता करता यावी म्हणुन.<br>२. इतर आर्थिक संस्थामधून पगार कपात कर्ज दिले जाते, त्याचप्रमाणे संस्थेला देता यावे म्हणुन. |

## विविध ठेव योजना :-

### मुदत ठेवीवरील व्याज दर



| कालावधी | व्याजदर | कालावधी | व्याजदर |
|---|---|---|---|
| ३० दिवस ते ४५ दिवस | ७.५०% | १ वर्षे ते २ वर्षापेक्षा कमी | १०.५०% |
| ४६ दिवस ते ९० दिवस | ८.५०% | २ वर्षे ते ३ वर्षापेक्षा कमी | ११.००% |
| ९१ दिवस ते १८० दिवस | ९.००% | ३ वर्षे ते ४ वर्षापेक्षा कमी | ११.२५% |
| १८१ दिवस ते ३६४ दिवस | ९.५०% | ४ वर्षे व अधिक | ११.००% |

* मुदत व मासिक प्राप्ती ठेवीवर एक वर्षे व त्यापेक्षा अधिक मुदतीसाठी जेष्ठ नागरिक/अपंग/विधवा यांना $^1/_2$% (अर्धा टक्का) अधिक व्याज.

### मासिक प्राप्ती योजना

| मुदत वर्षे | ठेव रक्कम (सर्वसाधारण) | ठेव रक्कम (ज्येष्ठ नागरिक/अपंग/विधवा) | दरमहा मिळणारी रक्कम |
|---|---|---|---|
| १ वर्षे ते २ वर्षापेक्षा कमी | रु. १,१४,३००/- | रु. १,०९,१००/- | रु. १,०००/- |
| २ वर्षे ते ३ वर्षापेक्षा कमी | रु. १,०९,१००/- | रु. १,०४,३५०/- | रु. १,०००/- |
| ३ वर्षे ते ४ वर्षापेक्षा कमी | रु. १,०६,७००/- | रु. १,०२,१५०/- | रु. १,०००/- |

### शुभकार्य ठेव योजना

| दरमहा | भरा | मिळवा |
|---|---|---|
| रु. ६००/- | फक्त ६६ महिने | रु. ५०,०००/- |
| रु. १२००/- | | रु. १,००,०००/- |

### आवर्त ठेव योजना

| कालावधी | व्याजदर | कालावधी | व्याजदर |
|---|---|---|---|
| १२ महिने | १०.००% | ३६ महिने | १०.५०% |
| २४ महिने | १०.२५% | ४८ महिने | ११.००% |

### शुभलक्ष्मी ठेव योजना

| मासिक ठेव रक्कम | ३६ महिन्यानंतर मिळणारी रक्कम |
|---|---|
| रु. ५,०००/- | रु. २.०० लाख |
| रु. २,५००/- | रु. १.०० लाख |
| रु. १,२५०/- | रु. ५० हजार |



### वैभवलक्ष्मी ठेव योजना

| कालावधी | व्याजदर |
|---|---|
| २५ महिने | ११.५० % |

### * धनसमृध्दी ठेव *

| कालावधी | व्याजदर |
|---|---|
| १५ महिने | ११.२५ % |



### * धनसंचय ठेव *

| कालावधी | व्याजदर |
|---|---|
| १५१ दिवस | १०.०० % |



### दामदुप्पट ठेव योजना आपली रक्कम ७७ महिन्यात दामदुप्पट



## विविध कर्ज योजना

**तत्काळ कर्ज**
सोने तारण कर्ज
१० ग्रॅमला रु. १७,०००/-
व्याजदर १३.५०%

**तारण कर्ज**
ठेव तारण
LIC / NSC

**वैयक्तीक कर्ज**
रु. १.०० लाख
व्याजदर १७%

**वाहन तारण कर्ज**
रु. १५.०० लाख
व्याजदर १५%

**गृहतारण कर्ज**
रु. २५.०० लाख पर्यंत
व्याजदर १४%

**सुरक्षित तारण**
रु. ४०.०० लाख पर्यंत
व्याजदर १५%

# पारिजात

को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.

पॅनकार्ड सुविधा

## खुशखबर

पॅनकार्ड सुविधा

केंद्र शासनाच्या आयकर विभागाने बंधनकारक केलेले



# पॅनकार्ड



आता पारिजात संस्थेमार्फत सर्व नागरीकांस उपलब्ध.

पतसंस्थेच्या माध्यमातून अशी सेवा देणारी 'पारिजात'
पहिली व एकमेव संस्था.

---



# पारिजात



को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., नवी मुंबई

## विद्यार्थी गुणगौरव सोहळा सन २०१३-१४

सभासदांच्या हुशार मुलांचा गुणगौरव वार्षिक सर्व साधारण सभेत केला जाणार आहे. सभासदांना विनंती करण्यात येते की, त्यांनी २०१३-१४ या शैक्षणिक वर्षात इयत्ता १० वी आणि १२ वी परीक्षेत ७०% पेक्षा जास्त गुण असलेल्या मुलांचे अर्ज दिनांक ०४/०८/२०१४ पर्यंत संस्थेच्या कार्यालयात त्वरीत पाठवावे. अधिक माहितीसाठी शाखा कार्यालयात संपर्क साधावा.



संस्थेच्या वेबसाईटचे उद्घाटन करताना
मा.श्री. नारायण बांदल साहेब,
संचालक-कुर्ला नागरी सहकारी बँक
आणि संचालक मंडळ




सन २०१२-२०१३ 'उत्कृष्ट शाखा' पुरस्कार
स्विकारताना संस्थेच्या नवीन पनवेल शाखेचे
कर्मचारी व ठेव प्रतिनिधी




संस्थेचे सर्वोत्कृष्ट दैनंदिन ठेव प्रतिनिधी
पुरस्कार स्विकारताना
श्री. महांगडे (दादर शाखा)




संस्थेने आयोजीत केलेल्या 'विद्यार्थी गुणगौरव'
कार्यक्रमात गुणवंत विद्यार्थीनी कु. श्वेता ताकवले
हिस स्मृतीचिन्ह व पारितोषिक देताना संस्थेचे
मा. संचालक श्री. अनंत प्रभाळे साहेब

# आपल्या सेवेत कार्यरत आमच्या शाखा

**: प्रशासकीय कार्यालय :**

पारिजात भवन, प्लॉट नं. १८, सेक्टर १० ए, नेरुळ, नवी मुंबई ४०० ७०६.
दुरध्वनी : ०२२-२७७०५१२७ / ३२५९६९९०

## मुंबई विभाग

| | |
|---|---|
| **वाशी** | अे-३/७, सेक्टर -१५, मराठा भवन मार्ग, वाशी, नवी मुंबई - ४०० ७०३. फोन : २७८०२६५९ / ३२०८६६६४ |
| **नेरुळ** | साईप्रसाद शॉपिंग कॉम्प्लेक्स, शॉप नं. २८, प्लॉट नं. १७, सेक्टर -८, नेरुळ, नवी मुंबई - ४०० ७०६. फोन : ३२५९६९८५ |
| **दादर** | मगनलाल डी-बिल्डींग, रुम नं.१६, पहिला मजला, कबुतरखान्याजवळ, स्टेशन रोड, दादर(प.), मुंबई-४०००२८. फोन : ३२०८६६६५ |
| **कोपरखैरणे** | के.पी.हेरिटेज को-ऑप.हौ.सो., शॉप नं.१०, प्लॉट नं.४१, सेक्टर -७, पोस्ट ऑफिस समोर, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७०९ फोन ; ३२४८६८०६ |
| **न्यु पनवेल** | ओमश्री निकेतन को-ऑप.हौ.सो., शॉप नं.८, प्लॉट नं.१२ ए, सेक्टर -१, महात्मा शाळेसमोर, खांदा कॉलनी, न्यु पनवेल-४१०२०६ फोन : ३२६७४६५८ |

## पुणे विभाग

| | |
|---|---|
| **धनकवडी** | सरस्वती मंगल कार्यालय, पहिला मजला, सर्व्हे नं. -२९/१, पुणे-सातारा रोड, धनकवडी, पुणे - ४११ ०४३. फोन : ०२०-३२९०६७४६ |
| **हडपसर** | शॉप नं.४१,अमर समृद्धी कॉम्प्लेक्स, आकाशवाणी केंद्राजवळ, सोलापुर रोड, हडपसर, पुणे - ४११ ०२८. फोन : ०२०-३२५१७६७१ |
| **सिंहगड रोड** | सुर्या प्लाझा, शॉप नं.१०, पहिला मजला, सर्वे नं.-८, धायरी रोड, वडगाव खुर्द, पुणे-४११०४१. फोन : ०२०-३२५३११०२ |
| **चंदननगर** | बेंद्रे बिल्डींग, पहिला मजला, सर्व्हे नं. -४६/१, संघर्ष चौक, खराडी रोड, चंदननगर, पुणे - ४११ ०१४. फोन : ०२०-३२३११७२२ |

प्रेषक :

**पारिजात**
**को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.**
पारिजात भवन, प्लॉट नं. १८, सेक्टर १० ए, नेरुळ(प.),
नवी मुंबई ४०० ७०६. फोन : ३२५९६९९०/२७७०५१२७
E-mail : parijatsociety@rediffmail.com / parijatsociety@gmail.com

बुक - पोस्ट
प्रति ,
____________________

आमुंडकर प्रिंटर्स - २७८८ ९३७७ | ९८२०५८०२५२ | E-mail : amundkar.9@gmail.com